**जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय**
**नगर पालिका प्रशासन शाखा**
दुसरा मजला, कॉम्प्लेक्स एरीया, मुल रोड, गडचिरोली
इमेल- dao.gadchiroli५२@gmail.com कार्या-दूरध्वनी क्र. ०७१३२- २२२२०५

क्र.कार्या-१०/नपाप्र/न.पं.सार्व.निवडणूक-२०२१/कावि-६९३/सं.क्र. /२०२१ दिनांक१३ नोव्हेंबर, २०२१

# प्रेस नोट

याद्वारे सुचित करण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १२.११.२०२१ रोजी जाहिर केलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार चामोर्शी नगर पंचायत क्षेत्रातील आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरीता नागरीकांच्या मागास वर्ग प्रवर्ग आणि नागरीकांचा मागास प्रवर्गातील माहिला व सर्वसाधारण महिला यांचे आरक्षण सोडत पध्दतीने निश्चित करावयाचे आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी नगर पंचायतींच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या उपजिल्हाधिकारी संवर्गाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली चामोर्शी नगर पंचायतींची खाली दर्शविल्याप्रमाणे नागरीकांच्या मागास वर्ग प्रवर्ग आणि नागरीकांचा मागास प्रवर्गातील माहिला व सर्वसाधारण महिला यांचे आरक्षण सोडत पध्दतीने जागा निश्चित करण्यात येतील.

| अ. क्र. | नगर पंचायतीचे नाव | नियंत्रक अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | मुख्याधिकारी यांचे नाव | आरक्षण व सोडत काढण्याचा दिनांक व वेळ | आरक्षणाच्या सोडतीचे स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नगर पंचायत, चामोर्शी | श्री. यु. ए. तोडसाम, उप विभागीय अधिकारी, चामोशी | श्रीमती माधुरी सलामे, मुख्याधिकारी, नगर पंचायत, चामोर्शी | १५.११.२०२१ (सोमवार) वेळ स.११.०० वा. | नगर पंचायत कार्यालय, चामोर्शी यांचे सभागृहात |

वरील प्रमाणे जागा निश्चित करण्याच्या सोडतीच्या वेळी ज्या नागरीकांना इच्छा असेल त्यांनी आरक्षण निश्चितीच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्यास आवाहन करण्यात येत आहे.

**स्वा/-**
**संजय मीणा (भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी, गडचिरोली**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी,
गडचिरोली.

यांनी उपरोक्त प्रेस नोट गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खप असलेल्या वृत्तपत्रात, स्थानिक स्तरावर प्रसिध्द होणाऱ्या वृत्त पत्रात न चुकता **दिनांक १४.११.२०२१ (रविवार)** ला देण्याचे करावे व वृत्त पत्राचे कात्रण या कार्यालयास सादर करावे.

**प्रतिलिपी :- माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

१. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी उपरोक्त प्रेस नोट जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे सांकेतस्थळावर दिनांक **१३.११.२०२१ (शनिवार)** ला प्रसिध्द करावे व तसे या कार्यालयास अवगत करावे.
२. उप विभागीय अधिकारी, चामोर्शी यांनी सदरचे नोटिस दिनांक **१३.११.२०२१ (शनिवार)** रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
३. तहसिलदार, चामोर्शी यांनी सदरचे नोटिस दिनांक **१३.११.२०२१ (शनिवार)** रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
४. मुख्याधिकारी, नगर पंचायत, चामोर्शी यांनी सदरचे नोटिस दिनांक **१३.११.२०२१ (शनिवार)** रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
५. जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी सदरचे नोटिस दिनांक **१३.११.२०२१ (शनिवार)** रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
६. **स्थळ प्रत**

**अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली**